04

ISSN - 2279 - 0489
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X Issue - II February - July - 2022

English / Marathi Part - II

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GENIUS"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 6.631** (www.sjifactor.com)

## EDITORIAL BOARD

**Dr. S. Umesha**
Dept. Of Studies in Biotechnology, University of Mysore, Manasagangotri, Mysore, India.

**Dr. Tharanikkarasu K.**
Dept. Of Chemistry, Pondicherry University (Central University), Kalapet, Puducherry, India.

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka, Dhaka 1000, Bangladesh.

**Dr. Altaf Husain Pandit**
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

**Prof. Avinashi Kapoor**
Head, Dept. Of Electronic Science, Dean, Faculty of Interdisciplinary Sciences, Chairman, Board of Research Studies, South Campus, University of Delhi, New Delhi, India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. Of Physics, University School of Sciences, Gujarat University, Ahmedabad, India.

**Dr. Uday P. Dongare**
Head, Dept. Of Physical Education, Shivaji Art's, Commerce & Science College, Kannad, Aurangabad, India.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast, Locked Bag 4, Maroochydore DC, Queensland, 4558 Australia.

**Dr. K. B. Laghane**
Dean, Faculty of Management Science, Dean, Faculty of Commerce (Dr. B.A.M.U.) Head Commerce Dept., Vivekanad College, Samarth Nager, Aurangabad, India.

**Brian Schiff**
Brussels, Copenhagen, Madrid, Paris.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. Of Computer Science & Applications, Bhavnagar University, India.

**Dr. Nicholas Ioannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor, Faculty of Computing, North Campus, London Metropolitan University, 166-220 Holloway Road, London, N7 8DB, UK.



**PUBLISHED BY**

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# EDITORIAL BOARD


**Dr. Hanumanthappa J.**
Dept. Of Studies In Computer Science, University of Mysore, Manasagangotri, Mysore-570 006, Karnataka, India.

**Dr. Asharf Fetoh Eata**
College of Arts or Science Salman Bin Adbul Aziz University, KAS.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide, Dept .of Economics Deogiri College, Aurangabad, India.

**Dr. Isita Lahiri**
Dept. of Business Administration, University of Kalyani, Kalyani West Bengal.

**Dr. Nirmala S. Padmavat**
Assit. Prof. English Dept. Nutan Mahavidyalaya, Selu, Dist: Parbhani

**Dr. J. S. Choudhary**
Principal, Art and Comm. College Warwat-Bakal, Dist. Buldhana.

**Dr. Rajendra S. Korde**
Dept. of Political Science, Art and Comm. College Warwat-Bakal, Dist. Buldhana

**Dr. Sanjay Tale**
Asst. Prof. Dept. of Commerce, Art and Comm. College Warwat-Bakal, Dist. Buldhana.

**Dr. Subhash Gurjar**
Asst. Prof. Head Dept. of Economics, Art and Comm. College, Warwat-Bakal, Dist. Buldhana.

**Dr. Nilesh Nimbalkar**
Professor Head Dept. of Political Science, S. K. K. College, Jalgaon (Jamod), Dist. Buldhana.



PUBLISHED BY

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF ENGLISH


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | A Study of Awareness of Indian Constitution with Special Reference to Educational Provisions among B.Ed. Student Teachers<br>**Dr. Ajaykumar B. Patil** | 1-5 |
| 2 | The Role of Media in Indian Democracy<br>**Aparna Rajhans** | 6-8 |
| 3 | Indian Foreign Policy: Nature and Principles<br>**B. M. Nagaraj** | 9-15 |
| 4 | Indian Democracy and Foreign Policy<br>**Dr. Channanarasimhappa** | 16-22 |
| 5 | Role of Mass Media in the Political Socialization of the Students<br>**Dr. Cindrella Sandeep D'Mello** | 23-28 |
| 6 | Centre-State Financial Relations in India - A Study<br>**Dr. J. L. Banashankari** | 29-34 |
| 7 | Indian Constitution: An Analysis of the Fundamental Rights and the Directive Principles<br>**L. Nagaraja**<br>**Muthaher Unnisa** | 35-40 |
| 8 | Child Labor & Indian Democracy<br>**Dr. Rahul N. Dhumal** | 41-47 |
| 9 | Decriminalizing Suicide Attempts: An Indian Trajectory<br>**Dr. Sunitha K. K.** | 48-54 |
| 10 | Gender Issues in Modern India<br>**Dr. Syed Tanvir Badruddin** | 55-59 |
| 11 | Leadership (A Descriptive and Analytical Study)<br>**Virendra Murlidhar Gharde** | 60-63 |
| 12 | Indian Modern Art and Democracy: A Critical Analysis<br>**Ananda Karmakar** | 64-69 |
| 13 | Child Labor : A Study of Laws and their Enforcement in the Context of Child Labor in India<br>**Prof. Barge Shital Kalidas** | 70-74 |

# CONTENTS OF ENGLISH


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 14 | Women's Security and Indian Democracy<br>**Prof. Barge Shital Kalidas** | 75-79 |
| 15 | Democracy and Leadership in India<br>**Dr. Faruqui Mohammed Quayyum M. Younus** | 80-85 |
| 16 | A Glance on IGST Settlement with Telangana State<br>**Kumaraswamy Mora** | 86-90 |
| 17 | A Comprehensive Study of Financial Performance of MSC Bank<br>**Mr. Rupesh Bhau Gaikar**<br>**Dr. B. M. Khamkar** | 91-96 |
| 18 | Traditional Political Institution and Democratic System of Yimkhiung Nagas<br>**S. Obed Yimchunger** | 97-102 |
| 19 | Role of Media in Indian Democracy<br>**Dr. Prashant D. Satpute** | 103-107 |
| 20 | A Study the Importance of GST in Indian Economy<br>**Dr. Yashwant H. Ulvekar**<br>**Dr. Praful P. Vashenikar** | 108-113 |
| 21 | Philosophy of Justice in the Preamble of the Indian Constitution<br>**Principal, Dr. Subhash S. Gawai**<br>**Mr. Utkarsh Gautam Mohod** | 114-120 |
| 22 | Child Labour in Context to India<br>**Dr. Renu Bayaskar** | 121-129 |
| 23 | Gender Issues after Seventy-Five Years of Indian Democracy<br>**Dr. Manjusha Y. Dhoble** | 130-135 |

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | वाढती बालमजुरी एक अभिशाप<br>**डॉ. राजेश सुधाकर डोंगरे** | १-५ |
| २ | स्त्रि-सुरक्षा आणि भारतीय लोकशाही<br>**श्री. शिंगणे नागेश श्रीकृष्ण** | ६-८ |
| ३ | भारताच्या विकासात महिलांचे योगदान<br>**डॉ. राष्ट्रपाल गणवीर** | ९-१४ |
| ४ | सयुक्त राष्ट्र संघात भारताची भूमिका<br>**प्रा. शेख गफूर अहमद** | १५-१८ |
| ५ | भारतातील ७५ वर्षात महिलांच्या राजकीय प्रवासाची वाटचाल<br>**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे** | १९-२३ |
| ६ | भारतीय लोकशाही आणि जाती व्यवस्था<br>**डॉ. राजेंद्र कोरडे** | २४-२७ |
| ७ | लिंगभाव समस्या आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. डॉ. वैशाली शा. कंकाळे** | २८-३६ |
| ८ | दक्षिण आशियातील देशांशी चीनचे वाढते संबंध आणि भारतावरील प्रभाव<br>**पाटील गायत्री विश्वास**<br>**डॉ. के. बी. पाटील** | ३७-४३ |
| ९ | ग्रामीण व शहरी भागातील ग्रंथालयांमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास<br>**शशिकांत सुभाष पाटील** | ४४-४८ |

# ५. भारतातील ७५ वर्षात महिलांच्या राजकीय प्रवासाची वाटचाल

**प्रा. डॉ. प्रिया भा. बोचे**
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेडराजा.

**प्रस्तावना**

स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय चळवळीवर नजर टाकली तर आपल्या असे लक्षात येते की, भारतीय राजकारणात स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा होता. महात्मा गांधीच्या असहकाराच्या व सत्याग्रही चळवळीत स्त्रीयांनी प्रत्यक्ष सहभाग घेवून ब्रिटीश सरकारच्या विरोधात उभ्या राहील्या. आंबेडकरांच्या चळवळीत दलित स्त्रियांचा अतिशय महत्त्वाचा सहभाग होता. स्वातंत्र्योत्तर काळात देखील संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीसारख्या तत्कालीन राजकीय चळवळीत स्त्रियांनी सहभाग घेतला. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनामध्ये स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा होता. परंतु नंतर मात्र राजकारणाच्या दलदलीपासून स्त्रिया लांब राहील्या. त्यांनी फक्त समाजकारण केले, राजकीय व सामाजिक कार्यामध्ये समाजकार्य श्रेष्ठ असे त्यांना भासवण्यात आले व स्त्रियांनी स्वतःला समाजकार्यात गुंतवूण घेतले, त्यामुळे त्या राजकारणात जास्त रमल्या नाहीत. राजकीय आरक्षणासाठी स्त्रिया लढल्या आणि आरक्षण मिळवून त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के राजकीय आरक्षणावर निवडणूका लढवू लागल्या, त्यामुळे महिलांचा सहभाग वाढल्याचे दिसते. काही महिलांच्या राजकारणातील प्रवेशाने पुरूषांचे सत्तेतील हस्तक्षेप करायचे प्रमाण वाढले, कारण काही महिला ह्या राजकारणात फक्त नामनिर्देशित असतात. परंतु शिकलेल्या महिलांच्या राजकीय सहभागाने पायाभूत सुविधामध्ये बदल झाले. दारूबंदी, महिला उद्योग, बचत गट या संदर्भात महत्त्वाचे काम केले.

**विषय:** भारतीय लोकशाहीतील ७५ वर्षांच्या काळातील महिलांचा राजकीय प्रवास कसा झाला, त्याची वाटचाल कशी सुरू आहे त्यात येणाऱ्या अडचणी याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदरहू ठिकाणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विश्लेषण**


ज्या महिलांच्या राजकीय क्षेत्रातील पदार्पण हे पतीराज पाहतात त्यांनी हे लक्षात घ्यायला पाहीजे की, महिलांना राजकारणात प्रतिनिधीत्व मिळविण्यासाठी खूप मोठा संघर्ष करावा लागला. जेव्हा इंग्लंडमध्ये मताधिकार चळवळ सुरू होती, त्याच वेळेस भारतातील स्त्रियांना देखील मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी सरोजनी नायडू, यांनी मार्गारेट कुझीन आणि ॲनी बेझंट यांना सोबत घेवून महिलांचे एक प्रतिमंडळ बनविले आणि त्या आपल्या मागण्या घेवून तत्कालीन सचिव माँटेग्यू यांच्याकडे गेल्या या प्रतिमंडळात महाराष्ट्रातील महिला ही सहभागी होत्या त्यात प्रामुख्याने रमाबाई रानडे आणि राणी लक्ष्मीबाई यांचा समावेश होता. व्हाईसरॉयने प्रतिमंडळाच्या मागण्यासंदर्भात जो निर्णय घ्यायचा तो प्रांतिक मंडळाकडे

सोपविला, प्रथम सन १९२१ मध्ये मद्रासच्या प्रांतिय विधीमंडळाने पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांना मतदानाचा अधिकार मिळाला. इतर देशांतील महिलांना आपल्या राजकीय हक्कांसाठी रस्त्यावर उतरून आंदोलने व संघर्ष करावा लागला पण आपल्याला जो संविधानाने हक्क दिला तो दुसऱ्यांच्या हातची कठपूतली होवून न वापरता आपल्याला जे योग्य वाटेल त्यानुसार करावा, आपल्याला नको असलेले सरकार आपण पाडू शकतो तर हवे असलेले सरकार आणू शकते, आपले एकमत देखील सरकार बदलू शकते.

पहिल्या लोकसभेत (१९५२-५७) निवडणूकीत ४८९ जागांपैकी ४३ जागांवर स्त्रियांनी निवडणूक लढविली आणि १४ महिला निवडून आल्या. १९५० च्या विधीमंडळात एकूण तीन हजार जागांवर २१६ पैकी ८० महिला निवडून आल्या. १९५२ मध्ये लोकसभा निवडणूकीत महिलांना ४.४ टक्के इतका सहभाग होता. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूकीत राजकीय पक्षांनी २५ महिलांना उमेदवारी दिली व २२ महिला उमेदवार निवडून आल्या, पाचव्या लोकसभा निवडणूकीत राजकीय पक्षांनी ७० महिलांना उमेदवारी दिली पैकी १९ निवडून आल्या.

भारतीय लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेत गेल्या ६६ वर्षात ८१८ महिला खासदार निवडून आल्या आहेत. त्यामध्ये लोकसंख्येच्या ६३२ तर राज्यसभेच्या १८६ महिला खासदारांचा समावेश आहे. राज्यसभेत गेल्या ६६ वर्षात २१ महिला खासदारांना राष्ट्रपतींनी नामनिर्देशीत केले आहे. सन १९५२ पासून आजतागायत देशात १० हजार ९७० खासदार निवडले गेले आहेत, त्यामध्ये लोकसभेत निवडून गेलेल्या खासदारांनी संख्या ही ८८.५५ टक्के इतकी आहे तर २१.१५ टक्के खासदार राज्यसभेवर निवडून गेले आहेत, यामध्ये ४६ महिला खासदारांचा समावेश आहे. राज्यसभेवर आजपर्यंत महाराष्ट्रातून १५१ खासदार निवडले गेले यामध्ये महाराष्ट्रातील १४ महिला खासदारांचा समावेश आहे. राष्ट्रपतींनी आजपर्यंत देशातील १३३ खासदारांना राज्यसभेवर नामनिर्देशीत केले, यामध्ये २१ महिला खासदारांचा समावेश आहे. महाराष्ट्रातून आजपर्यंत ७ महिलांना राष्ट्रपतींना नामनिर्देशीत केले आहे. १६ व्या लोकसभेत सर्वाधिक ६५ महिला खासदारांची नोंद झाली, यामध्ये महाराष्ट्रातील ६ महिला खासदारांचा समावेश आहे. पंधराव्या लोकसभेत एकूण ५६० खासदारांपैकी ६४ महिला खासदार होत्या. पहिल्या लोकसभेत ५४३ खासदार होते यामध्ये २४ महिला होत्या. दूसऱ्या लोकसभेत २४ महिला खासदारांचा समावेश होता. १९७७ च्या निवडणूकीत महिलांचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १९ होते.

आलेख




पहिल्या लोकसभेपासून ते आजपर्यंत उत्तर प्रदेश या राज्याने १३९४ खासदार लोकसभेवर निवडून दिले, यामध्ये १२१ महिला खासदारांचा समावेश आहे. पश्चिम बंगालचे ६५, मध्यप्रदेश ६२, बिहार ५९, महाराष्ट्र ४६, आंध्रप्रदेश ४५, राजस्थान ३०, गुजरात २७, पंजाब २४, तामिळनाडू २१३, ओडिसा १६, कर्नाटक १५, आसाम १५ तर दिल्लीतून १३ महिला खासदार आजपर्यंत लोकसभेवर निवडून गेल्या आहेत. राज्यसभेवर सर्वाधिक वेळा निवडून आलेल्या खासदारांमध्ये श्रीमती नजमा हेपतूल्ला या राज्यसभेवर गेल्या याबरोबर श्रीमती अंबीका सोनी ५ श्रीमती जया बच्चन ३, श्रीमती रेणुका चौधरी ३, श्रीमती झरणादास कानीमोझी, निर्मला सितारामन, बानसूक, बिप्लव्वा ठाकूर २ वेळा निवडून गेल्या आहेत.

रायटर्स वृत्तसंस्थेच्या आकडेवारीनुसार भाजपाने ११.८ टक्के महिलांना आणि काँग्रेसने १२.८ टक्के महिलांना उमेदवारी दिली आहे. म्हणजे राष्ट्रीय पातळीवर सुध्दा चित्र वेगळे नाही. महिलांना राजकारणात कमीच लेखले जाते याला अपवाद तृणमृल काँग्रेस आहे त्यांनी ४२ पैकी १७ जागांवर म्हणजे ४० टक्के महिलांना उमेदवारी दिली तर ओडीशामध्ये बिजू जनता दलनेही ३३ टक्के जागांवर महिलांना उमेदवारी दिली, कमी महिलांना उमेदवारी दिली तर संसदेतल्या महिलांची संख्याही साहजीकच कमी राहते. भारतीय संसदेत ११ टक्के महिला लोकप्रतिनिधी आहे तर राज्याच्या विधानसभेत हा आकडा ९ टक्के आहे. जागतीक दृष्टीने विचार केला तर भारत जगात १९३ देशामध्ये १४९ त्या स्थानावर आहे. याबाबतीत अफगाणीस्तान, पाकिस्तान, बांग्लादेश, सौदी अरेबीया, सुदान हे देश सुध्दा पुढे आहेत.

महिलांना जास्त प्रतिनिधीत्व दिल म्हणजे त्यांचे प्रश्न सुटतील असे नाही, पण लोकप्रतिधीत्व ही त्यांची पहिली पायरी ठरू शकते. म्हणूनच राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा राजकीय सहभाग वाढायला हवा हे सर्वच पक्ष मान्य करतात, पण आरक्षणाचे ते विधेयक अजुनही प्रलंबीत आहे आणि प्रत्यक्षात निवडणूकीतही महिलांना उमेदवारी देण्याबाबतचा हात राजकीय पक्षांनी आखडता घेतला आहे.

राजकारणात महिलांची टक्केवारी वाढतांना दिसत असून नुकत्याच झालेल्या १७ व्या लोकसभेच्या निवडणूकीत तब्बल ७२४ महिला उमेदवारांनी आपले नशीब अजमावले, पैकी ७८ महिलांना संधी मिळाली. महिला खासदारांची ही आजपर्यंतची विक्रीम संख्या आहे, यापैकी ४१ महिलांनी या आधीही खासदार पदाची जबाबदारी सांभाळली आहे.

काँग्रेसच्या ५४ महिला उमेदवारांपैकी ८ निवडून आल्या. बि.जे.पी. ने ५३ महिलांपैकी ४० निवडून आल्या, राष्ट्रवादी काँग्रेस १ महिला उमेदवारापैकी १ निवडून आली, तृणमूल काँग्रेस ९, बिजु जनता दलाच्या ५, वाय.एस.आर. काँग्रेसच्या ४, द्रमुकच्या २, स.प., जनता दल संयुक्त, अपना दल, एलजेपी समाजवादी पार्टी, निवसेना, टिआरएस, एनपीपी यांच्या प्रत्येकी १ आणि २ अपक्ष अशा एकूण ७८ महिला निवडून आल्या. महाराष्ट्रातून ९१ महिला उमेदवार रिंगणात होत्या, पैकी ८ महिला खासदार निवडून आल्या. सर्वाधिक १२ महिला खासदार पश्चिम बंगाल, त्यानंतर उत्तर प्रदेश ११ महिला खासदार निवडून आल्या.

महिला मतदारांची संख्या देशात ४३.१३ कोटी आहे. महाराष्ट्रात ४ कोटी १६ लाख २४ हजार ८१९ महिला मतदार आहे, तुलनेत महिला खासदाराचे देशातले प्रमाण २०१४ च्या निवडणूकीनुसार १४ टक्के आहे. देशात महिला मतदारांची संख्या ज्या प्रमाणात वाढते त्या प्रमाणात महिलांचे प्रतिनिधीत्व लोकसभेत वाढतांना दिसत नाही. १९५२ पासून २०१४ पर्यंत महिला मतदाराचे प्रमाण जवळपास निम्मे आहे. ४८.५ टक्के इतके वाढले असले तरी महिला खासदाराचे प्रमाण आजच्या सहा दशकात ८ टक्के वरून केवळ १२.६ टक्के ऐवढेच वाढले आहे. १९५२ मध्ये ८० लाख लोकसंख्येच्या मागे एक महिला खासदार होती आता ते प्रमाण ९० लखामागे १ महिला खासदार असे नगण्य आहे. महाराष्ट्रातूनही प्रतिनिधीत्व अल्प आहे. महिला खासदार आणि आमदारांची संख्या तर पूरोगामी म्हणवून घेणाऱ्या महाराष्ट्राला शोभणारी नाही. महिलांचे लोकसभेतील प्रमाण १२ टक्के पेक्षा कमी आहे, तर विधानसभेत ते प्रमाणे ७ टक्के आहे.

**समारोप**

२०१९ मध्ये ७८ महिला लोकसभेवर निवडून आल्या, १४ टक्के स्त्रिया संसदेच्या खालच्या सभागृहात पोहचल्याची आतापर्यंतची सर्वात मोठी टक्केवारी आहे, असे असले तरी महिला आरक्षण विधेयक मंजुर करण्यासाठी सरकार फारसे सक्रीय नाही त्यामुळे या विधेयकाने पुन्हा महिला खासदार आणि संघटनांची चिंता वाढवली. जस्टीस रसना यांच्या मते, "फारच कमी ७५ वर्षानंतरील सर्व स्तरावर महिलांसाठी किमान ५० टक्के प्रतिनिधीत्व अपेक्षीत असेल परंतु मला हे स्विकारणे फार कठीण वाटते की, मोठ्या अडचणीनंतर आता आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपिठाने केवळ ११ टक्के महिलांच्या प्रतिनिधीत्वाबाबत परवानगी दिली आहे. महिलांच्या संधींना संसद आणि विधानसभेत सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था म्हणून समान प्रतिनिधीत्व दिली पाहीजे, जेणेकरून देशातील अर्ध्या लोकसंख्येचा समान प्रतिनिधीत्व मिळू शकेल, जेव्हा राज्यसभेत या विधेयकांला मंजुरी मिळाली त्यावेळी वाटले की आता देशाच्या राजकारणात महिलांचा सहभाग वाढेल आणि त्यांचा राजकारणातील प्रवेश सुकर होईल पण अद्याप तसे झाले नाही केवळ पंचायत स्तरावर महिलांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे हे तर वास्तव असले तरी मात्र हे विधेयक लोकसभेत मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे.

परंतु राजकारणात सक्रीय होतांना महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, त्यामुळे त्यांचे प्रमाण फारच अल्प आहे. स्त्रीयांना राजकारणात पुढे येतांना त्यांना राजकारणातील गुन्हेगारी, चारित्र्यहनन याची भिती दाखविली जाते,

त्यांच्या मनात राजकारणाविषयी एक प्रकारे नकारात्मकता रूजविल्या जाते तरी सुध्दा राजकारणात सक्रीय होणाऱ्या महिलांचे प्रमाण सतत वाढतच असलेले आपल्या लक्षात येते.

**सारांश**

संविधानकारांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी सुरूवातीपासून स्त्री-पुरूष समानतेचे धोरण स्विकारून दोघानाही समान राजकीय अधिकार प्रदान केले असल्यामुळे १९५२ च्या पहिल्या लोकसभेत २२ महिला निवडून आल्या होत्या ही संख्या आता वाढत जावून २०१९ च्या निवडणूकीत ती ७८ वर पोहोचली तर लोकसभेच्या एकूण जागांच्या ५० टक्के जागा स्त्रियांसाठी राखून ठेवाव्यात असे विधेयक संसदेत आहे. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीने स्थानिक शासन संस्थेत महिलांना ३३ टक्के व आता ५० टक्के आरक्षण मिळाल्यामुळे त्याचा शासन कारभारात सहभाग वाढला. महिलांच्या प्रतिनिधीत्वामुळे महिला राजकीय सक्षमीकरणास वेग मिळत आहे. १९५१ ते २०१९ कालावधीत महिला खासदारांच्या संख्येत जवळपास तीनपट वाढ झाली आहे. आकडेवारीवरून असे लक्षात येते की, स्त्रीयांचे लोकसभेतील प्रतिनिधीत्व सातत्याने वाढत आहे. स्त्रीयांचे लोकसभेतील प्रतिनिधीत्व वाढल्यास स्त्रीयांवरील अन्याय दूर होईल आणि देशाच्या निर्णय प्रक्रीयेतील त्यांचा सहभाग वाढेल.

**संदर्भ ग्रंथ**

1. Women`s Participation in Politics. Sosheela Kaushik, Vikas Publishing House, 1993.
2. bytesofind.com
3. Political Participation Wikipedia
4. 'दै. सकाळ' लोकशाहीत महिला उपेक्षितच, २२ मार्च २०१९.